International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# भारतीय इतिहासाच्या जडणघडणीत आदिवासी समाजाचे बहुआयामी योगदान

**डॉ. आकाश ब. पवार**
*(पोस्ट डॉक्टरेट), मराठी व भाषा वाङ्मय विभाग*
*डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर*
*Corresponding Author – डॉ. आकाश ब. पवार*
**DOI - 10.5281/zenodo.17659526**

**प्रास्ताविक :**

भारतीय उपखंडाचा इतिहास केवळ मोठ्या साम्राज्यांच्या आणि प्रसिद्ध राजवंशांच्या कथांनीच लिहिला गेलेला नाही तर त्यात येथील मूळनिवासी, अर्थात आदिवासी समाजाचे (Tribal Communities) अगणित आणि अनेकदा दुर्लक्षित योगदानही सामावलेले आहे. प्राचीन काळापासून ते आजतागायत आदिवासी समुदायांनी भारताच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांचा निसर्गाशी असलेला सखोल संबंध, त्यांचे पारंपरिक ज्ञान, दुर्दम्य साहस आणि अद्वितीय जीवनशैलीने भारतीय सभ्यतेला समृद्ध केले आहे.

**प्राचीन काळातील आदिवासी अस्तित्व आणि सामाजिक योगदान :**

भारतातील आदिवासी समाज हे या भूमीचे मूळनिवासी आहेत. त्यांचे अस्तित्व हडप्पा संस्कृतीपूर्वीपासूनचे मानले जाते. या संदर्भात गोकूदास मेश्राम म्हणतात की, "मानवशास्त्र (Anthropology) आणि मानववंशशास्त्र (Ethnology) खात्यांनी जी मृतशरीरे तपासली त्यांची नमुनेवजा द्राविडीयन शीर्षकांशी तुलना करुन ती निश्चितपणे द्राविडीयन आहेत असे ठरविले. त्यामुळे हडप्पा आणि मोहोंजोदडो येथील प्राचीन रहिवासी द्राविडीयन होते असे अनुमान निघते."[1] या संदर्भावरून असे लक्षात येते की अनेक मानववंशशास्त्रज्ञांच्या मते भारतातील काही आदिवासी समूह हे प्रोटो-ऑस्ट्रलॉइड, निग्रिटो आणि मंगोलॉइड वंशाशी संबंधित आहेत. जे हजारो वर्षांपूर्वी येथे स्थायिक झाले.

**सामाजिक व्यवस्था आणि कुटुंब :**

आदिवासी समाजाची स्वतःची एक सुसंघटित सामाजिक व्यवस्था आहे. यात गोत्र, कुळ आणि समुदाय महत्त्वाचे आहेत. अनेक आदिवासी समुदायांमध्ये किंवा जमातीमध्ये सामूहिक जीवनशैली (Communal Living) दिसून येते. जिथे संसाधनांचे वाटप आणि निर्णय सामूहिकरित्या घेतले जातात. स्त्रियांना समाजात महत्त्वाचे स्थान असते. या संदर्भाचा दाखला देताना मेश्राम लिहितात की, "सिंधू संस्कतीचे लोक व गडचिरोली-चंद्रपूर जिल्ह्यातील आजचे आदिवासी लोक यांच्यात वांशिक दृष्ट्या बरेच साम्य दितसे. या जिल्ह्यातील आदिवासी माडिया लोकात सिंधू संस्कृतीच्या लोकांप्रमाणे स्त्री प्रधान मातृदेवता,

अलंकार विविध कला आढळून येतात. माडिया स्त्री घरची मुख्य समजली जाते. तीच शेतीचे काम करते. ह्या जिल्ह्यातील आदिवासी स्त्री प्रधान कुटुंब पद्धती आढळून येते. आदिवासी स्त्रिया सिंधू संस्कृतीतील स्त्रियांप्रमाणे आकडे, कमरपट्टा, कर्णफूले, चाळ, बाजूबंद, बांगड्या अंगठ्या इत्यादी दागिने वापरतात."[2] अशा अनेक आदिवासी जमातीमध्ये स्त्रियांना निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग असतो. सद्य:स्थितीत आदिवासींमध्ये पितृसत्ताक पद्धती असली तरी स्त्रियांचे महत्त्व कमी नसते. पूर्वकालीन अनेक आदिवासी गावे त्यांच्या पारंपरिक स्व-शासन प्रणालीनुसार चालवली जातात. जसे की ग्रामसभा (Village Council) किंवा पंचायती जे त्यांच्या सामाजिक मूल्यांचे प्रतीक आहेत. परंतु ही प्रणाली आता नाहीसी झालेली दिसून येते.

**निसर्गातील सहजीवन आणि समता :**

आदिवासी समाजातील समतावादी मूल्ये (Egalitarian Values) वंश परंपरेने आलेले आहेत. ही भारतीय समाजाला एक महत्त्वाचा आदर्श देतात. त्यांच्यात वर्गभेद नसला तरी जातीय उतरंड क्वचितच आढळते. निसर्गाशी त्यांचे असलेले सहजीवन हे केवळ पर्यावरणीयच नाही तर सामाजिकही आहे. ते निसर्गाला ईश्वराप्रती मानतात आणि त्याचे शोषण करण्याऐवजी त्याच्याशी समरसून जगतात. या संदर्भात डॉ. तुकाराम रोंगटे लिहितात की, "आदिवासी स्त्रियांचे औदुंबर, पिंपळ, मोह, जांभूळ, बाहावा, हिरडा-बेहडा, साग, पळस, चिंच, बांबू, वड, धायटी, सादडा, धावडा, सायर, भोखर इ. वृक्षांशी अत्यंत पवित्र आणि भावनिक नाते निर्माण झालेले बघायला मिळते. निसर्ग आणि ऋतुमानांचे आदिवासींचे आखाडे, आदिवासींची निसर्गदेवता – कणसरीमातेची पूजा , पाऊस पडला नाही तरी वरुणराजावर स्वत:चं बरंवाईट करत नाही. निसर्गाला आपला 'सखा' व 'बंधुराया' म्हणणारी स्त्री, प्राणी –पक्षांशी एकरूप झालेला आदिवासी."[3] असे चित्र पाहायाला मिळते. निसर्गावर प्रेम करणारा हा आदिवासींच्या जवळ असतो. परंतु ज्यांनी हा निसर्ग उद्‌धवस्त करण्याचा प्रयत्न केला त्यांच्या विरुद्ध त्यांनी लढा उभारलेला आहे. त्यामुळे निसर्गातील येणारे समातावादी हे मूल्य आधुनिक समाजाला शाश्वत विकासाची दिशा दाखवते.

**आर्थिक विकासातील आदिवासी समाजाची भूमिका :**

आदिवासी समाजाचे योगदान केवळ सांस्कृतिक किंवा सामाजिकच नाही तर भारताच्या आर्थिक विकासात (Economic Development) देखील त्यांचे महत्त्वाचे स्थान आहे. त्यांची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने निसर्गावर आधारित असते. या संदर्भात प्रा. गौतम निमक म्हणतात की, "आदिवासी समुदायाची अर्थव्यवस्था अजूनही प्राथमिक स्वरूपाची आहे. आदिवासी लोक आपल्या उपजीविकेसाठी सभोवताल्या नैसर्गिक पर्यावरणावर अवलंबून आहेत. शेती करणे, कंद-मुळे आणि फळे गोळा करणे इत्यादी प्रकारची त्यांची आर्थिक कार्ये आहेत."[4] अशी ही साधी अर्थव्यवस्था आदिवासीमध्ये दिसून येते. हे एक आदिवासी समाजाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे.

**शिकार आणि अन्नसंकलन :**

प्राचीन काळापासून आदिवासी समाज हे शिकार आणि अन्नसंकलन करणारे होते. जंगलातील फळे, कंदमुळे, मध आणि प्राण्यांची शिकार करून ते आपला उदरनिर्वाह करत होते. हे पारंपरिक ज्ञान त्यांना हजारो वर्षे टिकून राहण्यास मदत करणारे ठरले. मधासाठी आजही देशविदेशात मोठ्याप्रमाणावर मागणी आहे. परंतु योग्य तो मोबदला आदिवासींना आजपर्यंतही मिळालेला नाही. मध, जंगलातील फळे,

डिंक गोळा करणे व त्यावर आपली उदनिर्वाह भागवणे असे जीवन त्यांच्या वाट्याला आलेल आहे.

**पारंपरिक शेती पद्धती :**

स्थलांतरित शेती (Shifting Cultivation), ज्याला 'झुम शेती' असेही म्हणतात, हा अनेक आदिवासी समुदायांचा एक महत्त्वाचा आर्थिक आधार आहे. सद्य:स्थितीत या पद्धतीवर पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून प्रश्नचिन्ह असले तरी पारंपरिक काळात ही पद्धत त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी वापरली जात होती. डोंगराळ भागातील शेती, भातशेती आणि विविध प्रकारच्या कडधान्यांची लागवड त्यांनी विकसित केली.

**वनोत्पादने आणि हस्तकला :**

आदिवासी समाज हे वनसंपत्तीचे खरे वारसदार आहेत. लघु वनोत्पादने (Minor Forest Produce), जसे की तेंदूपत्ता, डिंक, मध, औषधी वनस्पती, बांबू इत्यादी गोळा करून ते आपली उपजीविका चालवतात. ही उत्पादने केवळ त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन नसून ती भारतातील अनेक उद्योगांसाठी कच्चा माल पुरवतात. त्यांची हस्तकला (Handicrafts) - बांबूची उत्पादने, मातीची भांडी, लाकडी कोरीव काम, पारंपरिक वस्त्रे, चित्रकला (उदा. वारली चित्रकला, गोंड चित्रकला) आदिवासींमध्ये आढळते. या संदर्भात डॉ. माहेश्वरी गावित लिहितात, “दैनंदिन जीवनासाठी लागणाऱ्या अनेक वस्तू आदिवासी आजही निसर्गातील साधनांतून बनवितात. आदिवासी कलाकार एकाच प्रकारच्या वस्तू बनवित नाही. तो गरजेनुसार वस्तू बनवितो. वेळेच्या उपलब्धतेनुसार आणि प्रसंगाच्या निकडीनुसार त्या वस्तूवर कलाकुसर करतो व सुबकता आणतो. काही पारंपरिक संकेत पाळण्याच्या प्रयत्नांतून देखील साध्या साध्या वस्तू करताना तो आपले कसब पणाला लावतो.”[5] अशा बनवलेल्या हस्तकलांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मागणी आहे. ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते.

**जलव्यवस्थापन आणि नैसर्गिक संसाधनांचे जतन :**

अनेक आदिवासी समुदायांनी जलव्यवस्थापनाचे (Water Management) आणि नैसर्गिक संसाधनांच्या जतनाचे (Conservation of Natural Resources) अद्वितीय पारंपरिक ज्ञान विकसित केले आहे. डोंगर उतारावर पाणी अडवणे, छोटे बंधारे बांधणे आणि जमिनीतील पाण्याची पातळी टिकवून ठेवण्याचे त्यांचे ज्ञान हे आधुनिक जगासाठी आजही प्रेरणादायी आहे. “शहरातील घरें मोठी होती. घरे सडकांच्या दोन्ही बाजूस होती. सांडपाणी वाहून नेण्यासाठी गटारांची व्यवस्था होती. विटांच्या नाल्या बांधल्या होत्या. पाणी जिरण्यासाठी शोष मडके तयार करण्यात आले होते. काही स्वतंत्र तर काही सार्वजनिक नाल्या होत्या. घरातील कचरा टाकण्यासाठी लहान बांधकामे होती”[6] अशा पद्धतीचे व्यवस्थापन आदिवासींचे पूर्वकालीन हडप्पा संस्कृतीत आढळते.

**शैक्षणिक आणि पारंपरिक ज्ञान प्रणालीतील योगदान :**

आदिवासी समाजाची पूर्वकालीन शिक्षण पद्धती ही औपचारिक शाळांमधील शिक्षणापेक्षा वेगळी असली तरी ती पारंपरिक ज्ञान (Traditional Knowledge) आणि अनुभवावर आधारित आहे. परंतु त्यामध्ये काळानुसार बदल झालेला आढळून येतो.

**मौखिक परंपरा आणि लोककथा :**

आदिवासी समाजातील ज्ञान हे पिढ्यानपिढ्या मौखिक परंपरेने (Oral Tradition) पुढे जात असते. त्यांच्या लोककथा, गीते, नृत्ये, आणि म्हणींमधून त्यांचे जीवनदर्शन, सामाजिक मूल्ये, पर्यावरण विषयक ज्ञान आणि इतिहासाची माहिती

मिळते. या कथांमधून नैतिकता, साहस आणि सामूहिकतेचे धडे दिले जातात. या संदर्भात 'गोटूल' चे उदाहरण देताना डॉ. माहेश्वरी गावित लिहितात की, "गोटूल हे माडिया गोंड या जमातींचे युवागृह, आदिवासींचे सांस्कृतिक केंद्र. रोज सायंकाळी दिवासाची सर्व कामे आटोपताच हळूहळू युवक – युवतींचे पाय गोटूलकडे वळू लागतात. विधवा व विवाहित स्त्रियांना गोटूलमध्ये प्रवेश नसतो. मध गोळा करणे, शिकार करणे, शेतीची विविध कामे करणे अशा व्यावसायिक शिक्षणाबरोबर जमातीची शिस्त, सामाजिक न्याय, परंपरागत चालणाऱ्या प्रथा, परंपरा, नृत्य, गायनादी कलांचे शिक्षण, इतकेच नव्हे तर लैंगिक शिक्षणसुद्धा येथेच दिले जाते आणि भावी जीवनातील साथीदाराची निवड गोटूलमध्येच होत असते."[7] त्यामुळे मौखिक परंपरेने आलेले आदिवासी साहित्याचे जतन आजतागायत झालेले आढळते.

**नैसर्गिक औषधोपचार आणि वनौषधी ज्ञान :**

आदिवासी समुदायांकडे वनौषधींचे (Herbal Medicine) अफाट ज्ञान आहे. अनेक पिढ्यांच्या अनुभवातून त्यांनी विविध वनस्पतींचा उपयोग रोगांवर उपचार करण्यासाठी कसा करावा हे शिकले आहे. अनेक जटिल रोगांवर त्यांच्याकडे पारंपरिक उपचार पद्धती उपलब्ध आहेत. आपल्या समाजात जागृती करत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आदिवासी समाजाचे खूप बारकाव्याने निरीक्षण केले. ते आपल्या भाषणात सांगत असत की, "आदिवासी समाजाचा जंगलाशी पर्यायाने जडी-बुटीशी एक सभ्य आणि भावनिक गुंतागुंतीचा संबंध फार पूर्वीपासून येत आला आहे. कुठली वनस्पती कोणत्या आजारावर लागू पडते हे त्याला चांगलेच माहीत आहे. आणि ती कोणत्या कड्याकपारीत मिळू शकेल याचेही ज्ञान त्याच्याकडे आहे. म्हणून जर आपण आदिवासी बांधवांशी संयमाने आणि आपूलकीच्या नात्याने समन्वय साधला, त्याला दादा – बाबा करून विश्वासात घेतले आणि त्याच्याकडून त्या वनस्पतीबद्दल इत्यंभूत माहिती घेऊन जर का आपण ते संशोधन अत्यंत सचोटीने केले, तर आपला भारत देश ह्यामध्ये उच्चकोटीचे संशोधन करू शकतो."[8] अशी मांडणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर करतात. नैसर्गिक औषधोपचार आणि वनौषधी ज्ञान हा आधुनिक विज्ञानासाठी अभ्यासाचा विषय ठरला आहे. हे ज्ञान केवळ त्यांच्या समुदायापुरते मर्यादित नसून ते भारतीय आयुर्वेदिक आणि पारंपरिक वैद्यकशास्त्रालाही पूरक ठरले आहे.

**पर्यावरणीय शिक्षण :**

आदिवासींच्या जीवनशैलीत पर्यावरण शिक्षण हा अविभाज्य भाग आहे. ते मुलांना लहानपणापासूनच निसर्गाचा आदर करायला शिकवतात. झाडे, प्राणी आणि नद्यांशी असलेले आपले नाते समजावून सांगतात. हे अनौपचारिक शिक्षण त्यांना नैसर्गिक संसाधनांचे महत्त्व आणि त्यांचे जतन कसे करावे हे शिकवते.

**राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेतील सहभाग :**

भारतीय इतिहासात आदिवासी समाजाचे राजकीय योगदान हे अनेकदा दुर्लक्षित राहिले आहे पण त्यांचे स्वतःचे असे राज्य (Kingdoms) आणि प्रशासकीय (Administrative) व्यवस्था अस्तित्वात होती. हेही विसरता येत नाही.

**आदिवासी राज्ये आणि साम्राज्ये :**

मध्ययुगीन काळात अनेक आदिवासी राजघराणी उदयास आली, ज्यांनी मोठ्या प्रदेशांवर राज्य केले.

**गोंड राजे :** मध्य भारतातील गोंड राजांचे राज्य हे सर्वात महत्त्वाचे होते. राणी दुर्गावती (Rani Durgavati)

यांनी मुघलांशी शौर्याने लढा दिला. त्यांचे राज्य हे सुसंघटित प्रशासनासाठी ओळखले जात असे.

**चेरो राजे :** बिहार आणि झारखंडमधील चेरो राजांचे राज्य देखील बलवान होते. त्यांनी मुघलांना अनेकदा आव्हान दिले.

**अहोम साम्राज्य :** आसाममधील अहोम हे देखील मूळतः आदिवासी वंशाचे होते आणि त्यांनी सुमारे ६०० वर्षे आसामवर राज्य केले. त्यांचे राज्य हे केवळ लष्करी सामर्थ्यासाठीच नव्हे, तर त्यांच्या प्रशासकीय सुधारणा, स्थापत्यशास्त्र आणि सांस्कृतिक योगदानासाठीही प्रसिद्ध होते.

**भिल्ल राजे :** राजस्थान, गुजरात आणि मध्य प्रदेशातील भिल्लांचे स्वतःचे लहान-मोठे राज्य होते. त्यांनी स्थानिक स्तरावर प्रशासन चालवले.

या राज्यांनी केवळ आपापल्या प्रदेशांवर राज्य केले नाही तर त्यांनी व्यापार, कला आणि संस्कृतीलाही प्रोत्साहन दिले. त्यांची स्वतःची न्यायव्यवस्था आणि करप्रणाली होती.

**स्थानिक स्वराज्य आणि पारंपरिक न्यायव्यवस्था :**

भारतातील अनेक राज्यांमध्ये आदिवासी समुदायांमध्ये त्यांच्या पारंपरिक ग्रामसभा (Village Council) किंवा पंचायती प्रभावीपणे कार्यरत होत्या. त्या संस्था स्थानिक स्तरावरील वाद मिटवता. सामाजिक नियम लागू करतात आणि विकासाचे निर्णय घेतात. ही पारंपरिक न्यायव्यवस्था त्यांच्या सामाजिक मूल्यांवर आधारित होती आणि अनेकदा ती औपचारिक न्यायव्यवस्थेपेक्षा अधिक जलद आणि प्रभावी होती. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात त्यात झपाट्याने बदल झालेला दिसतो. संविधानिक राज्यात ते संविधानिक न्याय व्यवस्था किंवा  लढा उभारताना दिसतात.

**ऐतिहासिक स्वातंत्र्य संग्रामातील योगदान :**

ब्रिटिशांच्या आगमनानंतर आदिवासी समाजाच्या जीवनात मोठा व्यत्यय आला. त्यांची जमीन, जंगल आणि संसाधनांवर ब्रिटिशांनी कब्जा करणे सुरू केले. या अन्यायाविरुद्ध आदिवासी समुदायांनी दिलेला लढा हा भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा एक अविभाज्य भाग आहे. अनेक आदिवासी उठाव हे केवळ स्थानिक नसून, त्यांनी ब्रिटिशांना मोठ्या प्रमाणावर आव्हान दिले.

**महत्वाचे आदिवासी उठाव:**

**संथाळ उठाव (१८५५-५६) :** झारखंडमधील संथाळ आदिवासींनी ब्रिटिशांच्या जमीन महसूल धोरणांविरुद्ध आणि सावकारांच्या शोषणाविरुद्ध सिदो आणि कान्हू यांच्या नेतृत्वाखाली मोठा उठाव केला. हा उठाव क्रूरपणे दडपला गेला पण त्याने ब्रिटिशांविरुद्धच्या संघर्षाला एक नवी दिशा दिली.

**मुंडा उठाव (१८९९-१९००) :** बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली झारखंडमध्ये उलगुलान हा उठाव झाला. बिरसा मुंडा यांनी ब्रिटिशांविरुद्ध धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी लढा दिला. त्यांनी 'अबुआ राज' (आमचे राज्य) ची घोषणा केली. बिरसा मुंडा हे आज एक स्वातंत्र्य सेनानी आणि देवपुरुष म्हणून पूजले जातात.

**भिल्ल उठाव :** राजस्थान, गुजरात आणि मध्य प्रदेशातील तसेच महाराष्ट्रातील खानदेश भागात भिल्ल समुदायाने अनेकदा ब्रिटिशांविरुद्ध आणि स्थानिक राजेशाहीविरुद्ध उठाव केले. गोविंद गुरु (Govind Guru) यांनी १९१३ मध्ये 'भिल्ल राज' स्थापनेसाठी 'भगत आंदोलन' सुरू केले. ज्यात हजारो भिल्ल शहीद झाले.

**राघोजी भांगरे :** महाराष्ट्रातील महादेव कोळी समाजातील राघोजी भांगरे यांनी ब्रिटिशांविरुद्ध लढा दिला.

**नाईकडा उठाव :** गुजरातमध्ये नाईकडा आदिवासींनी ब्रिटिशांविरुद्ध लढा दिला.

**रंपा उठाव :** आंध्र प्रदेशातील अल्लुरी सीताराम राजू (Alluri Sitarama Raju) यांनी २० व्या शतकाच्या सुरुवातीला आदिवासींना एकत्र करून ब्रिटिशांविरुद्ध गनिमी काव्याने लढा दिला.

**ताना भगत आंदोलन :** झारखंडमध्ये जत्रा भगत यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू झाले. त्यांनी गांधीवादी अहिंसक मार्गाने ब्रिटिशांविरुद्ध आंदोलन केले.

या उठावांनी ब्रिटिशांना आदिवासी भागांमध्ये आपले धोरण बदलण्यास भाग पाडले. या उठावांमुळे जंगल कायदे (Forest Acts) आणि आदिवासींच्या जमिनीच्या हक्कांबद्दल जागरूकता निर्माण झाली. आदिवासींनी देशासाठी दिलेल्या बलिदानाने स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात एक सोनेरी अध्याय लिहिला आहे.

**सांस्कृतिक आणि कलात्मक योगदान :**

भारतीय संस्कृतीची विविधता ही आदिवासी संस्कृतीशिवाय अपूर्ण आहे. त्यांची कला, संगीत, नृत्य, सण आणि लोककथा यांनी भारतीय संस्कृतीला एक वेगळा आयाम दिला आहे.

**आदिवासी कला:**

**वारली चित्रकला :** महाराष्ट्रातील वारली समाजाची ही चित्रकला जगभरात प्रसिद्ध आहे. यात मानवी आकृत्या, झाडे, प्राणी आणि दैनंदिन जीवनातील प्रसंग त्रिकोणीय आणि वर्तुळाकार आकृत्यांमध्ये मांडले जातात.

**गोंड चित्रकला :** मध्य प्रदेशातील गोंड समुदायाची ही चित्रकला निसर्ग, प्राणी आणि पौराणिक कथांवर आधारित असते. यात बिंदू आणि रेषांचा वापर करून सुंदर नक्षीकाम केले जाते.

**पिथौरा चित्रकला :** गुजरात आणि मध्य प्रदेशातील राठवा आदिवासींची ही चित्रकला शुभ प्रसंगांवर भिंतींवर काढली जाते.

**मिथिला (मधुबनी) चित्रकला :** बिहारमधील ही चित्रकला अनेक आदिवासी घटकांनी विकसित केली आहे.

या चित्रकला केवळ कला प्रकार नसून, त्या आदिवासी समाजाच्या श्रद्धा, परंपरा आणि जीवनशैलीचे प्रतिबिंब आहेत.

**नृत्य आणि संगीत :**

आदिवासींचे नृत्य आणि संगीत हे त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. प्रत्येक सण, उत्सव किंवा महत्त्वाच्या प्रसंगी आदिवासी नृत्ये आणि गीते सादर केली जातात.

**घुमर :** भिल्ल समुदायाचे पारंपरिक नृत्य.

**कर्मा :** गोंड आणि ओरांव समुदायांचे नृत्य.

**आदिवासी संगीत :** ढोल, नगारा, बासरी, तुतारी यांसारख्या पारंपरिक वाद्यांचा वापर करून आदिवासी संगीत तयार केले जाते. जे त्यांच्या लोककथा आणि धार्मिक विधींशी संबंधित असते.

**सण आणि उत्सव :**

आदिवासींचे सण हे निसर्ग आणि त्यांच्या देवी-देवतांशी संबंधित असतात.

**सरहुल :** झारखंडमधील ओरांव, मुंडा, हो या समाजांचा महत्त्वाचा सण, जो निसर्गाच्या पुनरुज्जीवनाचे प्रतीक आहे.

**भगोरिया हाट :** मध्य प्रदेशातील भिल्ल समुदायाचा एक प्रसिद्ध वार्षिक उत्सव, जिथे तरुण-तरुणी जीवनसाथी निवडतात आणि पारंपरिक नृत्य-संगीताचा आनंद घेतात.

**करम :** झारखंड आणि छत्तीसगडमधील आदिवासींचा एक महत्त्वाचा सण.

हे सण केवळ मनोरंजनाचे साधन नसून, ते त्यांच्या सामाजिक एकतेचे, परंपरेचे आणि निसर्गाशी असलेल्या त्यांच्या आत्मिक संबंधाचे प्रतीक आहेत. या संदर्भात गोविंद गारे लिहितात, "संस्कृतीतील त्यांच्या रुढी, परंपरा, सण, उत्सव त्यांच्या सभोवतालच्या जीवनाशी निगडित असतात. पर्यावरणातील ऋतूंचे बदलते रंग आणि त्यातील अद्भुत चमत्कार ते सतत अनुभवत असतात. त्या सर्वांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष खोल ठसा त्यांच्या जडणघडणीवर पडत असतो. सामाजिक चालीरीती, धार्मिक सण, उत्सव, बाजारहाट, यात्रा आदी घटनांचा सांस्कृतिक जीवनावर प्रभाव पडलेला दिसतो."[9] त्यामुळे भारतातील एकूणच आदिवासींच्या संदर्भात गारे यांनी केलेले विधान हे उपयुक्त आहे.

**साहित्य आणि मौखिक परंपरा :**

आदिवासी समाजाचे स्वतःचे लिखित साहित्य कमी असले तरी त्यांची मौखिक परंपरा (Oral Tradition) अत्यंत समृद्ध आहे. त्यांच्या लोककथा, म्हणी, गाणी आणि कवितांमधून त्यांचे जीवनदर्शन, ऐतिहासिक घटना आणि सामाजिक मूल्ये व्यक्त होतात. अलीकडच्या काळात अनेक आदिवासी भाषांमध्ये साहित्य निर्मिती होत आहे. ज्यामुळे त्यांच्या संस्कृतीला एक नवीन ओळख मिळत आहे. "नागालँड प्रदेशातील आओ, अंगामी सेमा ह्या बोलींचा इतका विकास झालेला आहे की, त्यांनी विद्याभ्यासाच्या क्षेत्रात इतर भाषांना मागे टाकले आहे. आणि नागा विद्यार्थी माध्यमिक शिक्षणही ह्या भाषांमधून घेतात. आसाममध्ये 'बोडो' ही आदिवासी बोली अत्यंत प्रगत अवस्थेला पोहोचलेली असून, केवळ 15 वर्षांच्या काळात उच्च माध्यमिक आणि पदवीपूर्व शिक्षणक्रमात शिक्षणाचे माध्यम म्हणून तिला स्थान प्राप्त झाले आहे.''[10] यामुळे आदिवासींचा सामाजिक, साहित्यिक, मौखिक आणि सांस्कृतिक इतिहासात वाढ होत आहे.

**स्वातंत्र्योत्तर काळातील योगदान आणि आव्हाने :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. त्यांना संविधानात विशेष अधिकार देण्यात आले. जसे की आरक्षण (Reservation) आणि पंचायती राज कायदा (PESA Act), जो त्यांना त्यांच्या पारंपरिक स्व-शासन प्रणालीनुसार जगण्याचा अधिकार देतो. या संदर्भात डॉ. तुकाराम रोंगटे म्हणतात, "आता आदिवासींनी निराळा पवित्रा घेतला आहे. त्याचे म्हणणे आहे की, आपले संविधानच धोक्यात आले आहे. ते वाचवायचे असेल तर 'आमच्या गावामध्ये आमचे सरकार' असा तो नुसत्या पोकळ घोषणा देत नाही तर छत्तीसगढ, रांची ह्या जिल्ह्यांमधून आता स्वशासनाची जोरदार तयारी सुरू झाली आहे. त्यांनी आपल्या गावाकडे, वाड्यापाड्यांकडे येणाऱ्या रस्त्यावर, गावानजिक असणाऱ्या दगडांवर, खडकांवर, झाडांवर पाट्या लावल्या आहेत. 'आता आमचे स्वत:चे राज्य' आम्ही चालवणार. शासनाने आणि त्यांच्या अधिकाऱ्यांनी आमच्या गावात येऊ नये आणि आमच्या जंगल, जल, जमीन, नदी, खजिने याय आमच्या अधिकारामध्ये ढवळाढवळ करू नये."[11] तरच या पेसा कायद्याचा उपयोग होईल असे त्यांना वाटते.

**विकासातील सहभाग :**

आदिवासी समुदायांनी स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या विकासात महत्त्वाचे योगदान दिले आहे. अनेक आदिवासी तरुण शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांमध्ये (प्रशासन, शिक्षण, वैद्यकीय, अभियांत्रिकी) कार्यरत

आहेत. कला आणि क्रीडा क्षेत्रातही त्यांनी भारताचे नाव उंचावले आहे.

**आदिवासीं समोरील उभे आव्हाने :**

आदिवासी हा भारताचा मूळ रहिवासी असला तरी आदिवासी समाजाला आजही अनेक आव्हानांचा सामना करावा लागत आहे.

**शिक्षण आणि आरोग्य सेवांचा अभाव :**

दुर्गम भागांमध्ये शिक्षण आणि आरोग्य सेवा अजूनही पुरेसे पोहोचलेल्या नाहीत. त्यामुळे आदिवासी मुलांचे कुपोषाणचे प्रमाण अधिक वाढलेले आहे. या संदर्भात गौतम निकम म्हणतात, " शासनाने कुपोषणावर एकच तोडगा आणला आहे आणि तो म्हणजे 'नवसंजीवन' योजना. भरपूर निधीचा सोय या योजनेत आहे. आदिवासी मरो की जगो विकास मात्र राजकारणी, अधिकारी यांचा झाला पाहिजे. पंचवार्षिक योजनांवर कोट्यावधी रुपये खर्च होऊनही आदिवासी कुपोषणाचा प्रश्न सुटलेला नाही."[12] यावर शासनाने गंभीरपणाने विचार करणे गरजेचे आहे. तसेच शिक्षणाच्या बाबतीतही आदिवासींची अस्थायी अवस्था दिसून येत आहे. आदिवासी मुलामुलींकरीता मोफत शिक्षण मिळावे यासाठी आश्रमशाळांची स्थापना केली परंतु त्याही आश्रमशाळांचा दर्जा उंचावलेला आढळत नाही. आदिवासी विद्यार्थ्यांना भौतिक सेवा सुविधांपासून वंचित आणि उपेक्षित राहावे लागत आहे.

**जमीन हक्कांचा संघर्ष :**

विकास प्रकल्पांमुळे (धरणे, खाणी) अनेक आदिवासींना त्यांच्या पारंपरिक जमिनीतून विस्थापित व्हावे लागले आहे, ज्यामुळे त्यांच्या उपजीविकेवर परिणाम झाला आहे. "जंगलात 1978 आणि त्या पूर्वीपासून राहणाऱ्या आदिवासींचा लढा, त्यांच्या जंगल-जमिनीवरील हक्कांना मान्यता मिळावी म्हणून सुरू आहे. गेल्या 37 वर्षांत हे गरीब आदिवासी तालुक्यातील न्यायालय, जिल्हा न्यायालय, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय अविश्रांत व सातत्याने लढा देत आले आहेत. शासनाने त्यांच्या हक्कांची चौकशी करण्यासाठी वेळोवेळी समित्या नेमल्या, त्यांना अनेक चौकशी केल्या, परंतु आदिवासींचे जंगल जमिनीवरील हक्क आजतागायत निर्विवादपणे मान्य करण्यात आलले नाहीत."[13] ही शोकांतिका गौतम निमक यांनी मांडलेली आहे.

**सांस्कृतिक ओळख जतन करण्याचे आव्हान :**

आधुनिकीकरणामुळे त्यांच्या पारंपरिक संस्कृती आणि भाषांवर परिणाम होत आहे. या सांस्कृतिक जतनाच्या माध्यमातून आदिवासी जमातींचा सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासाचे पुनर्लोकन करण्यात मदत होईल. भारतातील आदिवासी जमातींवर होणारा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक बदल हा आजच्या युगात जागतिकीकरणाने होत आहे आणि या बदलात माणूस आपली पारंपरिक संस्कृती, रीतीरिवाज, परंपरा, सण-उत्सव, जन्ममृत्यू विधी इत्यादी सारख्या चारीरिती विसरत चालेला आहे. या परंपरा या विविध संशोधनाच्या माध्यमातून जतन करण्यात यायला पाहिजे. त्याच बरोबर आदिवासी जमातींना असणाऱ्या बोलीभाषा संकलण करुन त्यास विशेष शब्दसंग्रह तयार करणे गजेचे आहे. आधुनिकीकरणामुळे आदिवासी बोलीभाषेतील मूळ शब्द लोप होऊन त्या जाग सद्य:स्थितीतील शब्द वापरण्यात येतो त्यामुळे मुळचा शब्द नाहीसा होऊन त्याजागी नवीन शब्द रुजत आहे. परिणामी मूळ लोप होणाऱ्या शब्द संचित करणे महत्त्वाचे आहे.

थोडक्यात, भारतीय इतिहासाच्या जडणघडणीत आदिवासी समाजाचे योगदान हे अथांग आहे. त्यांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय,

ऐतिहासिक आणि सांस्कृतिक योगदान हे भारतीय सभ्यतेचा अविभाज्य भाग आहे. त्यांनी केवळ देशाच्या विविधतेत भर घातली नाही, तर त्यांच्या जीवनशैली, मूल्ये आणि परंपरांमधून आधुनिक जगाला निसर्गाशी समरसून जगण्याची आणि समतावादी समाज निर्माण करण्याची प्रेरणा दिली आहे.

स्वातंत्र्य संग्रामातील त्यांचे बलिदान, निसर्गाचे जतन करण्याची त्यांची वृत्ती, आणि त्यांची समृद्ध कला आणि संस्कृती हे भारतीय इतिहासाचे असे पैलू आहेत, जे जाणून घेणे आणि त्यांचे जतन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आदिवासी समाजाला योग्य मान, संधी आणि त्यांचे हक्क मिळाल्यास, ते भारताच्या भविष्याच्या जडणघडणीतही महत्त्वपूर्ण योगदान देत राहतील. त्यांच्या योगदानाची दखल घेऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणणे, त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचा आदर करणे आणि त्यांच्या समस्येचे निराकरण करणे हे एक विकसित आणि समतावादी भारत घडवण्यासाठी आवश्यक आहे. त्यांच्या समृद्ध इतिहासाची ओळख करून देणे हे केवळ एक अभ्यास नाही, तर ते एका न्यायपूर्ण आणि सर्वसमावेशक समाजाच्या निर्मितीसाठी आवश्यक पाऊल आहे.

**निष्कर्ष :**

1. आदिवासी समाजाचे भारतीय विकासात मोलाचे योगदान आहे.
2. स्वातंत्र्योत्तर काळात आदिवासींचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे.
3. भारत स्वातंत्र्याच्या काळात आदिवासी तरुणांनी अनेक बंड केले आहेत.
4. आदिवासींच्या कला, सौंदर्य, बोलीभाषा, संस्कृतीचे जतन होणेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**


1. मेश्राम गोकुळदास, आदिवासीं सिंधुसंस्कृतीचे वारसदार व त्यांचा धम्म, सुगावा प्रकाशन, पुणे. आवृत्ती दुसरी मार्च 2012, पृ. क्र. 40
2. मेश्राम गोकुळदास, आदिवासीं सिंधुसंस्कृतीचे वारसदार व त्यांचा धम्म, पृ. क्र. 40
3. रोंगटे तुकाराम, आदिवासी साहित्य :चितन आणि चिकित्सा, दिलीपराज प्रकाशन, पुणे. आवृत्ती जानेवारी 2014, पृ क्र. 9
4. निकम गौतम, आदिवासींच्या समस्या : एक अभ्यास, विमलकीर्ती प्रकाशन, चाळीसगाव, आवृत्ती दुसरी 2019, पृ. क्र. 14
5. गावित माहेश्वरी, आदिवासी लोकपरंपरा, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. पृ. क्र. 39
6. मेश्राम गोकुळदास, आदिवासीं सिंधुसंस्कृतीचे वारसदार व त्यांचा धम्म, पृ. क्र. 41/42
7. गावित माहेश्वरी, आदिवासी लोकपरंपरा, पृ. क्र. 21
8. गंधे दिवाकार संपा. लोकराज्य, आदिवासी विशेषांक, 1 मे 1988
9. गारे गोविंद, सातपुड्यातील भिल्ल ऐतिहासिक आणि सामाजिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. पृ. क्र. 37
10. गावित माहेश्वरी, आदिवासी लोकपरंपरा, पृ. क्र. 7
11. रोंगटे तुकाराम, आदिवासींचेही डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गोंदण क्रिएशन्स प्रकाशन, पुणे. पृ.क्र. 133/134
12. निकम गौतम, आदिवासी समस्या : एक अभ्यास, पृ. क्र. 20
13. निकम गौतम, आदिवासी समस्या : एक अभ्यास, पृ. क्र. 25